शाळा न्यायाधिकरण, मुंबई यांच्या नव्याने निर्माण केलेल्या कार्यालयासाठी फर्निचर व इतर सुविधा पुरविण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र.न्यायाप्र २३१७/प्र.क्र.४७/१७/प्रशा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगूरु चौक,
मंत्रालय (विस्तार इमारत), मुंबई - ४०००३२
दिनांक - ०४.०४.२०१८

संदर्भ :
१. जनहित याचिका क्र.१५६/२०११ व संलग्न प्रकरणांसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश.
२. शासन निर्णय समक्रमांक दि. ११.१०.२०१७
३. पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. पीठासीन/शाळान्याया/आस्था/२०१८/०१-०२ दि.०५.०१.२०१८.
४. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांचे त्र क्र. का.अ./ममुंवि/५६/२०१८, दि.०२.०१.२०१८.
५. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई, विद्युत विभाग, सा.बां.विभाग, वरळी, मुंबई यांचे पत्र क्र. ममुंविवि/३७०४/२०१७, दि. १५.१२.२०१७

प्रस्तावना :-

जनहित याचिका क्र.१५६/२०११ व संलग्न प्रकरणांच्या मा. उच्च न्यायालयामध्ये वेळोवेळी झालेल्या सुनावण्यांमध्ये शाळा न्याधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयाकरीता योग्य व पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेले होते. त्यानुसार संदर्भाधिन शासन निर्णय समक्रमांक दि. ११.१०.२०१७ अन्वये शिवडी विभागातील जी.डी. आंबेकर मार्ग आणि एकनाथ घाडी मार्ग, हाफकिन इन्स्टि्युटच्या समोर, परेल, मुंबई ४०००१२ येथील सी.टी.एस. क्र. ४२९ या भुखंडावरील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या कार्यालयाकरिता बांधलेल्या तीन मजली इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील २००० चौ. फुट जागा (संपुर्ण तिसरा मजला) पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयाकरिता वितरित करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी सदर जागेचा ताबा शाळा न्यायाधिकरणास दिलेला असून पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, मुंबई यांनी संदर्भाधिन दि.०५.०१.२०१८ च्या पत्रान्वये सदर जागेमध्ये न्यायालय सुरु करण्यासाठी आवश्यक असलेले कोर्टाचे डायस, पीठासीन अधिकारी यांचे चेंबर, स्टेनोकरीता केबिन, संगणक कक्ष रुम, रेकॉर्ड/अभिलेख कक्ष, कार्यालयाकरिता स्वतंत्र कक्ष इ. बाबतचे कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई, (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई व कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई, विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, वरळी, मुंबई यांनी सादर केलेले, शाळा न्यायाधिकरणाचे न्यायालय सुरु करण्यासाठी आवश्यक फर्निचर व इतर सुविधा यांच्या कामाचे एकुण रु. ४१,६०,६४३/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शाळा न्यायाधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयाकरिता दि. ११.१०.२०१७ च्या समक्रमांकाच्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेल्या शिवडी विभागातील जी.डी. आंबेकर मार्ग आणि एकनाथ घाडी मार्ग, हाफकिन इन्स्टियुटच्या समोर, परेल, मुंबई ४०००१२ येथील जागेत, शाळा न्यायाधिकरण, मुंबई यांचे नव्याने कार्यालय (न्यायालय) सुरु करण्यासाठी कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई, (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी सादर केलेल्या रु.३७,७४,०७३/- व कार्यकारी अभियंयता, मध्य मुंबई विद्युत विभाग, वरळी, मुंबई यांनी सादर केलेल्या रु.३,८६,५७०/- अशा एकूण रु.४१,६०,६४३/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त कामाचा खर्च शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या “२२०२- सर्वसाधारण शिक्षण,८०-सर्वसाधारण,८००-सर्वसाधारण,०३- न्यायाधिकरणे (०३)(०१) शाळा न्यायाधिकरणे २२०२१६१६ (अनिवार्य), १३- कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखालील सन २०१८-१९ या वित्तिय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या आर्थिक तरतूदीतून करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७ एप्रिल,२०१५ अन्वये वित्तिय अधिकार नियमपुस्तिका १९७८ मधील भाग एक उपविभाग दोन मधील अ.क्र.३७, नियम क्र.९०, अन्वये व त्यामधील अटींस अधीन राहून या विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०५१११९३४५८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.04.05 11:20:30 +05'30'

(र.प्र.आटे)

सह सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१. पीठासीन अधिकारी,शाळा न्यायाधिकरण, मुंबई
२. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई .
४. रजिस्टार, लघुवाद न्यायालय, धोबीतलाव, मुंबई.
५. उपायुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई .
६. सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई .
७. सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सह सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
९. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई, विद्युत विभाग, सा. बां. विभाग, वरळी, मुंबई .
१०. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई, (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई
११. निवडनस्ती